महाराष्ट्र शासन

समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१

दू.क्र.०२०-२६१२२७५२ ईमेल-aidedhostel@gmail.com

जा.क्र.सकआ/शिक्षण/स्वाधार/बँक डिटेल्स/का-५/२०२५-२६/4087 पुणे, दिनांक 16/१२/२०२५.

प्रति,

व्यवस्थापकीय संचालक,

महाआयटी कार्पोरेशन, मुंबई महाराष्ट्र- ४०००२०.

विषय :- सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात स्वाधार योजनेकरीता ऑनलाईन अर्ज करण्यास मुदतवाढ मिळणेबाबत.

संदर्भ :- १.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दि. २४.१२.२०२४.

२. आयुक्तालयाचे पत्र क्र.३८८९ दिनांक ०१.१२.२०२५.

३.विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी हक्क समिती, महाराष्ट्र राज्य यांचे निवेदन दिनांक २७.११.२०२५.

४. आयुक्तालयाचे पत्र क्र.३९८९ दिनांक ०८.१२.२०२५.

५. अध्यक्ष, सम्यक विद्यार्थी आंदोलन, पुणे यांचे निवेदन दिनांक ०२.०१२.२०२५.

६. प्रदेश महासचिव, वंचित बहुजन युवा आघाडी, प्रदेश कमिटी, महा. राज्य यांचे निवेदन दिनांक ०८.१२.२०२५.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून सामाजिक न्याय विभागामार्फत डॉ. वाबासाहेव आंबेडकर स्वाधार योजना ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत असून संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची व्याप्ती तालूका स्तरापर्यंत वाढविण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयामध्ये ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत दिनांक ३० नोव्हेंबर नमूद करण्यात आलेली आहे.

तथापि काही विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करतेवेळी पोर्टलवर येणा-या तांत्रिक अडचणीमुळे विहित मुदतीत ऑनलाईन अर्ज करता आलेले नाहीत. तसेच सहायक आयुक्त, समाज कल्याण अकोला, सहायक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी हक्क समिती, महाराष्ट्र राज्य यांनी स्वाधार अर्ज भरण्याकरीता विद्यार्थ्यांना मुदतवाढ देणेबाबत विनंती केली होती. त्यानुसार संदर्भ क्र.४ अन्वये दिनांक १५ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत यापूर्वी विनंती करण्यात आली होती. याबाबत शासन स्तरावरुन अद्याप आदेश अप्राप्त आहेत.

सद्यस्थितीत वंचित बहुजन युवा आघाडी, प्रदेश कमिटी, महा. राज्य , विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी हक्क समिती, महाराष्ट्र राज्य व सम्यक विद्यार्थी आंदोलन या विद्यार्थी संघटनांनी स्वाधार ऑनलाईन अर्ज करण्यास मुदतवाढ देणेबाबत आयुक्तालयास निवेदने सादर केलेली आहेत.

तथापि शासन निर्णय दिनांक २६ डिसेंबर २०२४ नुसार अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यास स्वाधार योजनेचा अर्ज भरण्याची मुदत प्रत्येक वर्षी जास्तीत जास्त ३० नोव्हेंबर पर्यंत राहील व ज्या विद्यार्थ्यांचा निकाल उशिरा लागल्याने महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रीया उशीरा होईल अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील प्रवेशानंतर एका महिन्याच्या आत स्वाधार योजनेसाठी अर्ज करता येईल असे नमूद करण्यात आलेले आहे. त्यानुसार शासकीय वसतिगृहात जागा उपलब्ध असल्यास सदर अर्जांचा शासकीय वसतिगृहातील प्रवेशाकरीता विचार करण्यात येईल. याबाबत आपल्या वेबसाईटवर सुचना निर्देशित कराव्यात.

त्याअनुषंगाने या शैक्षणिक वर्षातील ऑनलाईन अर्ज भरताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी व विद्यार्थ्याचे उशिरा सुरु होणारे शैक्षणिक सत्र, इ. बाबी विचारात घेवून व अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेवून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याकरीता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज स्वीकारणेकरीता दिनांक ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वेबसाईट सुरु ठेवावी ही विनंती.

16/12/25

(दिपा मुधोळ-मुंडे)
आयुक्त समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत माहितीस्तव -

१. कक्ष अधिकारी (शिक्षण-२), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग सर्व
३. सहायक आयुक्त, समाज कल्याण नांदेड/अकोला.
४. प्रदेश महासचिव, वंचित बहुजन युवा आघाडी, प्रदेश कमिटी, महा. राज्य.
५. अध्यक्ष, सम्यक विद्यार्थी आंदोलन, पुणे शहर.
६. अध्यक्ष, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी हक्क समिती, महाराष्ट्र राज्य.